**राज्यातील जिल्हा परिषदाअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेल्या परंतु ग्रामपंचायती / जिल्हा परिषदांनी हस्तांतरीत करुन न घेतलेल्या योजनांवरील लाभार्थ्यांकडून पाणीपट्टी वसूल करण्याचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रदान करणे.**

-------------------------------------------

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रः ग्रापापु-१०९८/प्र.क्र.१०२५/पापु-०७.**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,**
**दिनांक : १८ ऑगस्ट, १९९८.**

**प्रस्तावना :-**

राज्यातील सर्व गांवे / वाडया टॅकरमुक्त करुन जनतेला सदोदीत व स्वच्छ पिण्याचे पाणी नळाद्वारे सन २००० सालापर्यंत पुरविण्याचा संकल्प शासनाने केला आहे. त्यानुसार या कामासाठी लागणाऱ्या निधीची विविध मार्गाने उभारणी करुन शासन अशा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकारणामार्फत राबवित आहे.

तयार करण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजना हया संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुढील देखभाल व व्यवस्थापनासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी हस्तांतरीत करुन घेणे आवश्यक आहे. देखभाल व व्यवस्थापनाकरीता स्थानिक स्वराज्य संस्थांना अनेक प्रकारच्या सवलती पूरक अनुदाने शासनाकडून दिली जातात. त्याशिवाय शासनाने विहित केलेल्या किमान आणि कमाल दरानुसार जनतेवर पाणीपट्टी बसवून त्यातून हा खर्च भागवावयाचा आहे. वास्तवतः पाणी पुरविण्याची संविधानिक जबाबदारी ही देखील स्थानिक संस्थांची आहे. परंतु शासनाचा असा अनुभव आहे की, काही ग्रामपंचायती/ जिल्हा परिषदा हया अशा तयार योजना हस्तांतरीत करुन घेत नाहीत. परिणामी जनतेची पाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून अशा योजना हया नाईलाजास्तव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालू ठेवाव्या लागतात. त्याकरीता प्राधिकरणास योजनेवरील अनुदान खर्च करावे लागते आणि त्याचा परिणाम नवीन योजनावर देखील होतो. कारण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अशा देखभाल व दुरुस्तीसाठी कोणत्याही प्रकारचे अनुदान वा पाणीपट्टीची रक्कम दिली जात नाही . तेव्हा अहस्तांतरीत योजनांच्याबाबतीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जनतेकडून पाणीपट्टी वसूल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वर प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी विचारात घेवून ज्या योजना तयार केलेल्या आहेत परंतु त्या योजना हया राज्यातील संबंधित जिल्हा परिषदा/ ग्राम पंचायतीनी हस्तांतरीत करुन घेतल्या नाहीत, अशा सर्व योजनांच्या क्षेत्रातील सर्व नळजोडणी लाभधारकांकडून तसेच सार्वजनिक नळ कोंडाळयावरील लाभधारकांकडून अशी पाणीपट्टी ही दि. १ सप्टेंबर १९९८ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ठरविलेल्या दरानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ३५ नुसार आणि त्याअनुषंगाने विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वसूल करण्याची अनुमती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास शासन हया आदेशान्वये देत आहे.

२. सर्व संबंधित जिल्हा परिषदा/ग्रामपंचायती यांनी अशा अहस्तांतरीत योजनांच्या खर्चासाठी पाणीपट्टी दि. १ सप्टेंबर, १९९८ पासून वसूल करु नये. मात्र ज्या गावात जिल्हा परिषद / पंचायत समिती यांच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या इतर पिण्याच्या पाण्याच्या साधनासाठी पाणी पट्टी जिल्हा परिषद / ग्रामपंचायतीनी वसूल करण्यास हरकत नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(सु. ल. तिडके)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
२. मा. मंत्री, राज्यमंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव.
३. मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे स्विय सहाय्यक.
४. सर्व विभागीय आयुक्त.
५. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
७. सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
८. सह सचिव, सर्व उप सचिव, विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
9. सर्व कार्यासन अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.